राज्य योजना सन २०१८-१९
निसर्ग संवर्धन व वन्यपशू व्यवस्थापन
(२४०६ ०७७५)

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांकः डब्ल्यूएलपी-०५.१८/प्र.क्र.२१२/फ-१
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- १९ मार्च, २०१९.

वाचा :-

१. वित्त विभागाचे, शासन परिपत्रक, क्रमांक :- अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दिनांक ०२.०४.२०१८.
२. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्रमांक :- कक्ष-१/इए/यो/चाबाप्र/प्र.क्र.२३/१४७८/२०१८-१९, दिनांक :- २०.११.२०१८.
३. महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक :- डब्ल्यूएलपी-०५.१८/प्र क्र २१२/फ-१, दिनांक :- १७.०१.२०१९
४. वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्रमांक:- अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दिनांक २५.०१.२०१९.
५. महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक :- डब्ल्यूएलपी-०५.१८/प्र क्र २१२/फ-१, दिनांक :- ०२.०२.२०१९.
६. वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्रमांक:- अर्थसं-२०१९/प्र.क्र.४२/अर्थ-३, दिनांक ०८.०३.२०१९.
७. महसूल व वन विभाग, शासन ज्ञापन क्रमांक :- बीयूडी - २०१९/२४०६/प्र.क्र. १९/ब-१, दिनांक ११.०३.२०१९.

प्रस्तावना :-

सन २०१८-१९ राज्यस्तरीय योजनेअंतर्गत निसर्ग संवर्धन व वन्यपशू व्यवस्थापन (२४०६ ०७७५) या लेखाशिर्षांतर्गत रुपये १२००.०० लक्ष इतका नियतव्यय मंजूर व अर्थसंकल्पित करण्यात आला आहे. आतापर्यंत वित्त विभागाच्या वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या संदर्भ क्रमांक १ व ४ च्या मार्गदर्शक सुचनान्वये निसर्ग संवर्धन व वन्यपशू व्यवस्थापन (२४०६ ०७७५) या योजनांतर्गत विविध शासन निर्णयान्वये रु. ९६०.०० लक्ष निधी वितरीत करण्यात आला आहे.

संदर्भ क्रमांक ७ च्या शासन ज्ञापनामध्ये सन २०१८-१९ चा आठमाही सुधारीत अंदाज जाहीर करण्यात आला आहे. सदर आठमाही सुधारित अंदाजामध्ये निसर्ग संवर्धन व वन्यपशू व्यवस्थापन (२४०६ ०७७५) या लेखाशिर्षाअंतर्गत रु. १०७७.६० लक्ष सुधारित अंदाज रक्कम दर्शविण्यात आली आहे. सबब आता निसर्ग संवर्धन व वन्यपशू व्यवस्थापन (२४०६ ०७७५) या योजनांतर्गत रु. ११७.६० लक्ष निधी वितणासाठी शिल्लक आहे.

अपर प्रधान मुख्य वनसरंक्षक (अर्थसंकल्प नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी संदर्भीय पत्र क्रमांक २ अन्वये रु. ३०४.१४३ लक्ष चा प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर केला होता. सदर प्रस्तावामध्ये अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, मेळघाट व्याघ्र प्रकल्प यांच्या रु. २०२.६४३ लक्षच्या प्रस्तावाचा समावेश आहे.संदर्भीय शासन निर्णय क्र. ५ अन्वये राज्यस्तरीय योजनेअंतर्गत निसर्ग संवर्धन व वन्यपशू व्यवस्थापन (२४०६ ०७७५) या लेखाशिर्षांतर्गत अपर प्रधान

मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, मेळघाट व्याघ्र प्रकल्प यांच्या रु. २०२.६४३ लक्षच्या प्रस्तावाकरिता रु. २६.७८ लक्ष निधी वितरीत करण्यात आला आहे.

आता अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, मेळघाट व्याघ्र प्रकल्प यांच्या रु. २०२.६४३ लक्षच्या प्रस्तावाकरिता रु. १७५.८६३ लक्ष निधी वितरीत करणे आवश्यक आहे. निसर्ग संवर्धन व वन्यपशू व्यवस्थापन (२४०६ ०७७५) या लेखाशिर्षाअंतर्गत संदर्भ क्रमांक ६ च्या पत्रान्वये वितरणासाठी शिल्लक असलेल्या निधीच्या मर्यादेच्या अधिन राहून अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी मेळघाट व्याघ्र प्रकल्पाकरीता संदर्भ क्रमांक २ च्या पत्रान्वये सादर केलेल्या कार्यबाबीकरीता रु. ११७.६० लक्ष निधी वितरीत करणे अपेक्षित आहे.

<u>शासन निर्णय :-</u>

सदर शासन निर्णयान्वये अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी निसर्ग संवर्धन व वन्यपशू व्यवस्थापन (२४०६ ०७७५) या योजनेंतर्गत संदर्भीय पत्र क्र. २ अन्वये मेळघाट व्याघ्र प्रकल्पाकरिता सादर केलेल्या प्रस्तावास अनुसरून **रु. ११७.६० लक्ष** निधी सोबत जोडलेल्या तक्त्यानुसार खालील अटींच्या अधीन राहून खर्च करण्यास शासन मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

१. सदर योजनेवर खर्ची टाकावयाची रक्कम सन २०१८-१९ मध्ये लेखाशिर्ष मुख्य लेखाशिर्ष २४०६ वनीकरण व वन्यजीवन ११०, वन्यजीवाचे संवर्धन (००) (०२) निसर्ग संरक्षण व वन्यपशू व्यवस्थापन (२४०६ ०७७५) अंतर्गत उद्दिष्टनिहाय, अर्थसंकल्प वितरण प्रणालीव्दारे प्राप्त होणाऱ्या निधीतून करण्यात यावा.
२. योजनांतर्गत प्रस्तावीत कार्यबाबींना आवश्यकतेनुसार सक्षम प्राधिकाऱ्यांनी प्रशासकीय व तांत्रिक मान्यता प्रदान केलेली आहे याची खातरजमा झाल्यानंतरच सदर कार्यबाबींवर निधी खर्ची टाकण्यात यावा.
३. प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी संदर्भ क्रमांक २ च्या पत्रान्वये सादर केलेल्या योजनेंतर्गत प्रस्तावित कार्यबाबी निसर्ग संरक्षण व वन्यपशू व्यवस्थापन (२४०६ ०७७५) या योजनेच्या व्याप्तीमध्ये समाविष्ठ आहे याची खातरजमा झाल्यानंतरच सदर कार्यबाबींवर निधी वितरीत करण्यात यावा.
४. वितरीत केलेला निधी शासनाने दिलेल्या मान्यतेनुसार योजनेस विहीत केलेल्या मर्यादेत, प्रचलित नियमांच्या अधीन राहून, प्रचलित धोरण व वित्त विभागाने वेळोवेळी विहीत केलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार तसेच प्रस्तावात नमूद केलेल्या कार्यबाबींच्या अनुषंगाने खर्च करण्यात यावा
५. कार्यबाबीमध्ये खरेदीचा समावेश असल्यास शासनाने विहित केलेल्या गव्हर्मेंट-ई-मार्केटप्लस (Gem) पद्धतीचा अवलंब करुन खरेदी करण्यात यावी.
६. सदर शासन निर्णयान्वये वितरीत केलेला निधी वितरित करुन घेतलेला निधी मंडळे/ महामंडळे यांच्या वा इतर बँक खात्यात, स्वयप्रपंची लेख्यामध्ये अथवा सार्वजनिक बांधकाम विभागाकडील ठेव अंशदान निधी मध्ये काढून ठेवता येणार नाही.

७. वित्त विभागाने निर्गमित केलेल्या विविध मार्गदर्शन सूचनांचे व वित्त विभागाचे परिपत्रक क्रमांक - विअप्र-२०१३/प्र.क्र. ३०/२०१३/विनियम, भाग-२ ,दिनांक - १७.०४.२०१५, वित्त विभागाचे परिपत्रक क्रमांक - अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दिनांक ०२.४.२०१८ व वित्त विभागाचे परिपत्रक क्रमांक . अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दिनांक २५.०१.२०१९ व महसूल व वन विभाग, शासन पत्र क्रमांक :- बीयूडी - २०१९/२४०६/प्र.क्र. १९/ब-१, दिनांक ११.०३.२०१९ चे काटेकोर पालन करावे .

२. सदर शासन निर्णय वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्रमांक:- अर्थसं-२०१९/ प्र.क्र.४२/ अर्थ-३, दिनांक ०८.०३.२०१९ ला अनुलक्षून निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३१९१६४५२८४०१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Swapnil Deshbhratar

Digitally signed by Swapnil Deshbhratar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9add558653210cf44615291102f1bf143783e8403be64c06c7928e692d77c386, cn=Swapnil Deshbhratar
Date: 2019.03.19 16:47:09 +05'30'

(स्वप्निल देशभ्रतार)
विशेष कार्य अधिकारी
महसूल व वन विभाग

प्रत,

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
२. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
३. प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
४. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अमरावती
५. महालेखापाल१/२ (लेखा व अनुज्ञेयता)/ (लेखापरिक्षण), मुंबई/नागपूर.
६. ब-१, फ-२,फ-१ कार्यासन (निवडनस्ती), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

****

महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक:- डब्ल्यूएलपी-०५.१८/प्र.क्र.२१२/फ-१, दिनांक :- १९.०३.२०१९ च्या सोबतचे परिपत्रक.

अ.क्र.	वनवृत्त /विभागाचे नाव	एकूण रक्कम (रु.लाखात)
१	मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अमरावती.	११७.६०
	एकूण	**११७.६०**

*****